// गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्यविद्यापीठ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

**परीक्षा व मुल्यमापण मंडळ (गोपनिय)**

फोन:– ०७१३२.२२३३५०

Email:- confidential.section@unigug.ac.in

**गोवि/प.मु.मं/गोप/जा.क्र./२०८/२०२३** **दिनांक २४/०५/२०२३**

## परीपत्रक

विषय:– मा. प्राचार्य संलग्नित महाविद्यालय तथा गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली पदव्युत्तर शैक्षणिक विभाग सर्व विभागप्रमुख यांनी परीक्षेविषयक कार्याकरीता सहकार्य करण्याबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या परीक्षेच्या आयोजनामध्ये परीक्षेच्या पुर्व तयारी करीता तसेच परीक्षा नंतर च्या कार्याकरीता (म्हणजेच ४८/३ सभा, विषय समिती सभेचे कार्य तसेच उत्तर पत्रिका मुल्यांकनाचे कार्य) गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विषयनिहाय प्राध्यापकांची नितात आवश्यकता असते. आणि विद्यापीठा तर्फे त्या सबंधी नियुक्तीचे पत्र सबंधीत प्राध्यापकांना देऊन विद्यापीठामध्ये पाचारण केल्या जाते. सदर कार्य हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ४८/४ नुसार विहीत केल्या प्रमाणे आवश्यक ते सहाय्य आणि सेवा देणे बंधनकारक आहे.

परंतु सदर कार्य विद्यापीठामध्ये प्राध्यापकाव्दारे सुरु असतांना महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडुन संबंधीत प्राध्यापकांना महाविद्यालयामध्ये परत बोलावीले जाते, असा मुद्दा दिनांक १२ आणि १४ मार्च २०२३ रोजी आयोजीत अधिसभेमध्ये उपस्थित करण्यात आलेला होता.

सदर अधिसभेतील निर्णयानुसार गोंडवाना विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य तथा पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील सर्व विभाग प्रमुख गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, या नंतर आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यापीठामध्ये परीक्षेविषयक विविध कार्याकरीता रुजु होत असेल त्या वेळेस सदर कार्यातुन संबंधीत प्राध्यापकांना आपल्या मार्फत महाविद्यालयातील कामाकरीता परत बोलावु नये जेणेकरुन विद्यापीठाच्या परीक्षेविषयक कार्यात कुठलाही अडथळा निर्माण होणार नाही याची नोंद घ्यावी.

अधिसभेतील निर्णयानुसार

24.5.2023

(डॉ. अनिल झेड. चिताडे)<br>संचालक<br>परीक्षा व मुल्यमापन मंडळ,<br>गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी :

१) मा. कुलगुरु यांचे स्वीय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.<br>२) मा. प्र–कुलगुरु यांचे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(डॉ. संदेश सोनुले)<br>सहाय्यक कुलसचिव<br>गोपनिय विभाग<br>गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली